Vol III Issue I Feb 2013
Impact Factor : 0.2105
ISSN No : 2230-7850

Monthly Multidisciplinary
Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor
Ashok Yakkaldevi

Editor-in-chief
H.N.Jagtap

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## *International Advisory Board*

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## *Editorial Board*

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 3, Issue.1,Feb. 2013
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# “माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या भावनिक बुद्धिमत्तेचा त्यांच्या अध्यापन शैलीशी असलेल्या संबंधाचा अभ्यास”

**SUKHADA MATRE**

*सारांश*

शाळा हे ज्ञानाचे मंदिर आहे . येथील ज्ञान देणारा अध्यापक अत्यंत कृतिशील, संयमी आणि प्रेमळ असावा . विद्यार्थ्यांच्या भावनिक विकासाची जेवढी जबाबदारी कुटुंबाची असते . त्यापेक्षा जास्त शिक्षकांची असते . याचसाठी शिक्षणाने स्वत: भावनिक बुद्धिमान असणे आवश्यक होते . या भावनिक बुद्धिमान शिक्षकांच्या अध्यापन शैलीशी संबंधाचा अभ्यास या संशोधनम्ट करण्यात आला भावनिक दृष्टया साक्षर असणाऱ्या शिक्षकांची अध्यापन शैली प्रभावी आहे हे लक्षात येते .

## *प्रस्तावना*

माणसातील माणूसकीचा मंगल, सुंदर साक्षात्कार म्हणजे शिक्षण होय . मानवी व्यक्तिमत्त्वातील समग्र चैतन्याचा आविष्कार म्हणजे शिक्षण . शिक्षण ही अशी एकमेव प्रक्रिया आहे, जी माणसाला खऱ्या अर्थाने माणूसपण प्राप्त करुन देऊन दुसऱ्या माणसाशी माणूसकीच्या दृष्टीने वागण्यास भाग पाडते . आपल्या समाजातील सर्व अनिष्ट शक्तींचा प्रभाव नष्ट करण्यासाठी व देशातील प्रत्येक व्यक्तीला सुखी, समाधानी, यशस्वी जीवन जगता यावे यासाठी भावनिकदृष्टया सुदृढ बनविण्याचे कार्यही शिक्षण प्रक्रियेतून झाले पाहिजे . विद्यार्थ्यांच्या भावनिक विकासाची जेवढी जबाबदारी कुटुंबाची असते . त्यापेक्षा जास्त शाळेची आणि शिक्षकांची असते . विद्यार्थ्यांच्या मनातील शिक्षकाचे स्थान महत्त्वपूर्ण असते . आपला विद्यार्थी जसा असावा असे शिक्षकांना वाटते तसे त्यांनी प्रथम स्वत: असले पाहिजे . भावनिक बुध्दिमत्ता जगासमोर आणणाऱ्या गोलमनच्या मते,'भावनिक बुध्दिमत्ता ही एक अशी क्षमता आहे की, ज्यायोगे आपणास स्वत:च्या भावनांची, तसेच इतरांच्या भावनांची ओळख पटते,आपल्या भावनांचे व इतरांशी असलेल्या संबंधाचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी आपणास प्रेरणा मिळते .'

प्रत्येक व्यक्तित भिन्नाता असते त्याप्रमाणे शिक्षकांतही प्रत्येकजण दुसऱ्यापेक्षा निराळा असतो .शिक्षकांच्या या व्यक्तिभिन्नातेचा प्रभाव त्यांच्या अध्यापन शैलीवर पडण्याची शक्यता असते . अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत अध्यापन ही एक कला आहे असे म्हटले जाते की, ही कला असणारी व्यक्ती यशस्वी अध्यापक होऊ शकतो . शिक्षकांची अध्यापन शैली म्हणजे तो वर्गात कशाप्रकारे आंतरक्रिया घडवून आणतो . अध्यापन शैली उद्दिष्टाधिष्ठीत हवी, अध्यापन हे हृदयाशी संवाद जोडणारे असावे .

विद्यार्थ्यांचा बोधात्मक, भावात्मक, ज्ञानात्मक विकास घडविण्याचे कार्य शिक्षक शिक्षण प्रक्रियेत निरंतर करीत असतो आणि म्हणूनच शिक्षक विद्यार्थ्यांचे यशस्वी आयुष्य घडविण्यात स्वत:स भाग्यशाली समजत असतो .म्हणजे केवळ ज्ञानात्मक विकास नव्हे तर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणे हे शिक्षकांचे कार्य आहे . आजच्या शिक्षणातून विद्यार्थी शिक्षित झाला पण सुसंस्कारीत झाला नाही असे दिसते . ही परिस्थिती सुधारण्यासाठी शालेय शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या भावनिक विकासाकडे शिक्षकाने लक्ष पुरविणे आवश्यक आहे . यासाठी शिक्षकानी स्वत: भावनिक बुद्धिमत्ता जोपासणे आवश्यक आहे .

## संशोधन अभ्यासाची गरज

माध्यमिक स्तरावरील मराठी माध्यमाच्या शिक्षकांची भावनिक बुद्धिमत्ता आणि अध्यापन शैली, यातील सहसंबंधावर संशोधन झाले नाही म्हणूनच प्रस्तुत संशोधनात संशोधिकेस विद्यार्थ्यांचे जीवन घडविणाऱ्या पर्यायाने राष्ट्राचा विकास साधणाऱ्या माध्यमिक स्तरावरील शिक्षकांमधील भावनिक बुद्धिमत्ता व अध्यापन शैली या विषयावर संशोधन करण्याची गरज भासली .सदर संशोधनामुळे अध्यापन-अध्ययन क्रियेशी संबंधित सर्वच घटकांना लाभ होणार आहे . व्यक्तिमत्त्व विकासाच्या स्वरुपातील बोधात्मक, भावात्मक, ज्ञानात्मक क्षेत्राच्या दृष्टीने विविध कौशल्यांचा वापर करू न अध्यापन परिणामकारक करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करता येईल .

भावनिक बुद्धिमत्ता हा अध्ययन-अध्यापन प्रक्रियेचा भाग असून शिक्षकांच्या बुद्धिमत्तापूर्ण प्रयत्नांद्वारे व्यक्तीच्या जीवनात ती वाढ विता येऊ शकते . शारीरिक, मानसिक, आत्मिक व भावनिक अशा सर्व पातळयांवरील ध्येय साध्य करण्यास भावनिक बुद्धिमत्ता उपयुक्त ठरते . शिक्षकांनी अध्ययन-अध्यापन प्रक्रियेत आपल्या व विद्यार्थ्यांच्या भावना व इतर गुणविशेष समजून घेतले पाहिजेत . यासाठी सर्वप्रथम शिक्षकांनी भावनिक दृष्टया सक्षम असणे गरजेचे आहे .मानवी गुणांचा सुगंध सर्वत्र दरवळण्यासाठी, शिक्षकाचे अध्यापन परिणामकारक करण्यासाठी, शिक्षकांमध्ये भावनिक साक्षरता वाढ विण्यासाठी प्रयत्न करता येईल .

## संबंधित संशोधनाचे सिंहावलोकन

डॉ . भांडारकर अविनाश, डॉ . पाटील गीतादेवी यांनी, 'कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची भावनिक बुध्दिमत्ता आणि पर्यावरणीय मूल्यांचे अध्ययन' यांचा अभ्यास केला . राठी निरपाल आणि रस्तोगी यांनी, 'भावनिक बुध्दिमत्तेचा व्यावसायिक स्वक्षमतेवर होणारा परिणाम अभ्यासणे' यावर संशोधन केले .

पांडे (1981) यांनी अध्यापन शैली व विज्ञानातील संकल्पना प्राप्ती प्रतिमान यांचा अभ्यास केला . हॅन्स (1986) यांनी अध्यापन शैली, अध्ययन निष्पत्ती व अध्यापन परिणामकारकता यातील सहसंबंधाचा अभ्यास केला . अशा प्रकारे शिक्षकांची भावनिक बुध्दिमत्ता व अध्यापन शैली या संदर्भातील पूर्वी झालेल्या संशोधन अहवालाचे परिशीलन केले असता संशोधिकेच्या ध्यानात एक गोष्ट आली ती म्हणजे वरील विविध विषयात संशोधने झाली आहेत . परंतु भावनिक बुध्दिमत्ता व अध्यापन

शैली या विषयावर संशोधन झालेले नसून या विषयाचा अभ्यास करणे गरजेचे आहे .

**संशोधनाची उद्दिष्टे**

**1**)माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्तेची खालील गटात तुलना करणे -
अ) शिक्षक आणि शिक्षिका ब)ग्रामीण शिक्षक आणि शहरी शिक्षक
क)अनुदानित शाळेतील शिक्षक आणि विनाअनुदानित शाळेतील शिक्षक
ड)शैक्षणिक अनुभवानुसार

**2**)माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या अध्यापन शैलीची खालील गटात तुलना करणे -
अ) शिक्षक आणि शिक्षिका ब) ग्रामीण शिक्षक आणि शहरी शिक्षक
क)अनुदानित शाळेतील शिक्षक आणि विनाअनुदानित शाळेतील शिक्षक
ड)शैक्षणिक अनुभवानुसार

**3**)माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची भावनिक बुध्दिमत्ता व अध्यापन शैली यातील सहसंबंधाचा

खालील गटात अभ्यास करणे -

अ) शिक्षक आणि शिक्षिका ब)ग्रामीण शिक्षक आणि शहरी शिक्षक
क)अनुदानित आणि विनाअनुदानित शाळेतील शिक्षक ड)शैक्षणिक अनुभवानुसार
इ) एकूण शिक्षक

**संशोधनाच्या परिकल्पना**

**1**)माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्तेत खालील गटात लक्षणीय फरक नाही -
अ) शिक्षक आणि शिक्षिका ब)ग्रामीण शिक्षक आणि शहरी शिक्षक
क)अनुदानित आणि विनाअनुदानित शाळेतील शिक्षक ड)शैक्षणिक अनुभवानुसार

**2**)माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या अध्यापन शैलीत खालील गटात लक्षणीय फरक नाही -
अ) शिक्षक आणि शिक्षिका ब)ग्रामीण शिक्षक आणि शहरी शिक्षक
क)अनुदानित आणि विनाअनुदानित शाळेतील शिक्षक ड)शैक्षणिक अनुभवानुसार

**3**)माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची भावनिक बुध्दिमत्ता व अध्यापन शैली यात खालील गटात लक्षणीय सहसंबंध नाही -
अ) शिक्षक आणि शिक्षिका ब)ग्रामीण शिक्षक आणि शहरी शिक्षक
क)अनुदानित शाळेतील शिक्षक आणि विनाअनुदानित शाळेतील शिक्षक
ड)शैक्षणिक अनुभवानुसार ई) एकूण शिक्षक

**संशोधन अभ्यासाची व्याप्ती व मर्यादा**

प्रस्तुत संशोधनात संशोधिकेने शहरी भागामध्ये मुंबई उपनगर जिल्ह्याचा विचार केला आहे तर ग्रामीण भागामध्ये रायगड जिल्ह्यातील, उरण तालुक्याचा विचार केला आहे . अन्य तालुक्यांचा येथे विचार केलेला नाही . . संशोधनात मराठी माध्यमांच्या माध्यमिक शाळांचा समावेश केलेला आहे . हिंदी, इंग्रजी, उर्दू, गुजराती वा अन्य माध्यमांच्या माध्यमिक शाळांचा समावेश केलेला नाही . संशोधनात केवळ अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांचा समावेश आहे . कायम विनाअनुदानित, आश्रम शाळा, वस्ती शाळा यांचा समावेश केलेला नाही .

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत संशोधनात संशोधिकेने वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे . यामध्ये संशोधिकेने वर्णनात्मक संशोधन पद्धतीतील कारणमीमांसा तुलनात्मक पद्धती व सहसंबंधात्मक संशोधन पद्धतीचा उपयोग केला आहे .

**संशोधनाचा न्यादर्श**

नमुना निवडीसाठी त्रिस्तरीय नमुना निवड तंत्राचा वापर करण्यात आला प्रस्तुत संशोधनात माध्यमिक स्तरावरील मुंबई जिल्हातील **257** आणि उरण तालुक्यातील **239** शिक्षकांचा म्हणजेच एकूण **496** शिक्षकांचा समावेश करण्यात आला .

**संशोधनाची साधने**

प्रस्तुत संशोधनात आवश्यक माहिती मिळविण्याकरिता पुढील संशोधन साधनांचा वापर करण्यात आला .

1)शिक्षकांचे वैयक्तिक माहितीपत्रक
2)भावनिक बुध्दिमत्ता मापनश्रेणी - शिक्षकांची भावनिक बुध्दिमत्ता अभ्यासण्यासाठी संगीता श्रीवास्तव यांनी प्रमाणित केलेली भावनिक बुध्दिमत्ता मापनश्रेणी वापरण्यात आली .
3)अध्यापन शैली मापनश्रेणी - शिक्षकांची अध्यापन शैली अभ्यासण्यासाठी संशोधिकेने स्वत: तयार केलेली अध्यापन शैली मापन श्रेणी वापरण्यात आली .
माहिती विश्लेषणाची तंत्रे

प्रस्तुत संशोधनात माहितीचे विश्लेषण करण्यासाठी खालील वर्णनात्मक आणि अनुमानात्मक सांख्यिकी तंत्राचा वापर करण्यात आला .

1) वर्णनात्मक विश्लेषण-
अ)केंद्रीय प्रवृत्तीची परिमाणे
ब)विचलनशीलतेची परिमाणे

2) अनुमानात्मक विश्लेषण-
अ)'टी'परीक्षिका ब)ओमेगा गुणक
क)सहसंबंध गुणक

परिकल्पनांचे परीक्षण

परिकल्पना 1

माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या भावनिक बुध्दिमत्तेत खालील गटात लक्षणीय फरक नाही -

अ) शिक्षक आणि शिक्षिका ब)ग्रामीण शिक्षक आणि शहरी शिक्षक
क)अनुदानित आणि विनाअनुदानित शाळेतील शिक्षक ड) शैक्षणिक अनुभवानुसार

सारणी 1

माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या भावनिक बुद्धिमत्ता फरकाची लक्षणीयता

| भावनिक बुद्धिमत्ता | शिक्षक | शिक्षिका | ग्रामीण शिक्षक | शहरी शिक्षक | अनुदानित शाळेतील शिक्षक | विनाअनुदानित शाळेतील शिक्षक | 0 ते 10 वर्ष शैक्षणिक अनुभव | 10 पेक्षा जास्त वर्ष शैक्षणिक अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नमुना | 287 | 209 | 239 | 257 | 450 | 46 | 203 | 293 |
| मध्यमान | 210 .23 | 211 .21 | 211 . 04 | 210 .27 | 210 .17 | 215 .26 | 210 . 88 | 210 . 8 |
| प्रमाण विचलन | 15 .35 | 14 .29 | 14 .83 | 14 .99 | 14 . 93 | 14 .04 | 15 .72 | 14 . 86 |
| स्वाधीनता मात्रा | 494 | | 494 | | 494 | | 494 | |
| सारणी मूल्य 0 .05 | 1 .96 | | 1 .96 | | 1 .96 | | 1 .96 | |
| सारणी मूल्य 0 .01 | 2 .58 | | 2 .58 | | 2 .58 | | 2 .58 | |
| 'टी' परीक्षकेचे गुणोत्तर | 0 .7308 | | 0 .5748 | | 2 .328 | | 0 .2857 | |
| सार्थकता स्तर | लक्षणीय नाही | | लक्षणीय नाही | | 0 .05 | | लक्षणीय नाही | |

'टी' परीक्षिकेचे अर्थनिर्वचन

वरील सारणीवरुन असे दिसून येते की, अनुदानित आणि विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांच्या तुलनेत प्राप्त 'टी' 2 .3280 हा 1 .96 पेक्षा जास्त आहे . म्हणून अनुदानित आणि विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांच्या भावनिक बुद्धिमत्तेत 0 .05 स्तरावर लक्षणीय फरक आहे . यावरुन असे म्हणता येईल की, अनुदानित आणि विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांच्या भावनिक बुद्धिमत्तेत लक्षणीय फरक नाही . ही शून्य परिकल्पना त्याज्य ठरली आहे . तर उर्वरीत शिक्षकांच्या तुलनेत प्राप्त 'टी' हा 1 .96 पेक्षा कमी आहे . म्हणून ही परिकल्पना स्वीकारली गेली आहे .

### निष्कर्ष

माध्यमिक स्तरावरील शिक्षक व शिक्षिका, ग्रामीण शिक्षक व शहरी शिक्षक, 0 ते 10 वर्ष 11 पेक्षा जास्त शैक्षणिक अनुभव असणाऱ्या शिक्षकांच्या भावनिक बुद्धिमत्तेत लक्षणीय फरक नाही . म्हणजेच त्यांची भावनिक बुद्धिमत्ता समान आहे . अनुदानित शाळेतील शिक्षकांच्या तुलनेत विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांची भावनिक बुद्धिमता जास्त आहे .

### परिकल्पना 2

माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या अध्यापन शैलीत खालील गटात लक्षणीय फरक नाही -

अ) शिक्षक आणि शिक्षिका ब)ग्रामीण शिक्षक आणि शहरी शिक्षक
क)अनुदानित आणि विनाअनुदानित शाळेतील शिक्षक ड) शैक्षणिक अनुभवानुसार

सारणी 2

माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या अध्यापन शैली फरकाची लक्षणीयता

| अध्यापन शैली | | शिक्षक | शिक्षिका | ग्रामीण शिक्षक | शहरी शिक्षक | अनुदानित शाळेतील शिक्षक | विनाअनुदानित शाळेतील शिक्षक | 0 ते 10 वर्ष शैक्षणिक अनुभव | 10 पेक्षा जास्त वर्ष शैक्षणिक अनुभव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| णमुना | | 287 | 209 | 239 | 257 | 450 | 46 | 203 | 293 |
| मध्यमान | | 210 . 13 | 210 . 47 | 209 . 5 | 210 . 99 | 209 . 47 | 218 . 09 | 212 . 76 | 208 . 55 |
| प्रमाण विचलन | | 20 . 31 | 18 . 22 | 19 . 5 | 19 . 40 | 19 . 85 | 12 . 56 | 17 . 57 | 20 . 49 |
| स्वाधीनता मात्रा | | 494 | | 494 | | 494 | | 494 | |
| सारणी मूल्य | 0 . 05 | 1 . 96 | | 1 . 96 | | 1 . 96 | | 1 . 96 | |
| | 0 . 01 | 2 . 58 | | 2 . 58 | | 2 . 58 | | 2 . 58 | |
| 'टी' परीक्षकेचे गुणोत्तर | | 0 . 1955 | | 0 . 8524 | | 4 . 1545 | | 2 . 4497 | |
| सार्थकता स्तर | | लक्षणीय नाही | | लक्षणीय नाही | | 0 . 01 | | 0 . 05 | |

### 'टी' परीक्षिकेचे अर्थनिर्वचन

वरील सारणीवरुन असे दिसून येते की, माध्यमिक स्तरावरील अनुदानित आणि विनाअनुदानित शाळेतील शिक्षक यांच्या तुलनेत प्राप्त 'टी' 4 . 1545 हा 2 . 59 पेक्षा जास्त आहे . म्हणून अनुदानित आणि विनाअनुदानित शाळेतील शिक्षक यांच्या अध्यापन शैलीत 0 . 01 स्तरावर लक्षणीय फरक आहे . 0 ते 10 वर्ष आणि 10 पेक्षा जास्त वर्ष शैक्षणिक अनुभव असलेल्या शिक्षकांच्या तुलनेत प्राप्त 'टी' 2 . 4497 हा 1 . 96 पेक्षा जास्त आहे . म्हणजे त्याच्या अध्यापन शैलीत 0 . 05 स्तरावर लक्षणीय फरक आहे .

### निष्कर्ष

माध्यमिक स्तरावरील अनुदानित आणि विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांच्या अध्यापन शैलीत 0 . 01 सार्थकता स्तरावर लक्षणीय फरक दिसून येतो . 0 ते 10 वर्ष आणि 11 पेक्षा जास्त वर्ष शैक्षणिक अनुभव असलेल्या शिक्षकांच्या अध्यापन शैलीत 0 . 05 स्तरावर लक्षणीय फरक दिसून येतो . अनुदानित शाळेतील शिक्षकांच्या तुलनेत विनाअनुदानित शाळेतील शिक्षक ांची अध्यापन शैली जास्त चांगली आहे .

**परिकल्पना 3**

माध्यमिक स्तरावरील शिक्षकांची भावनिक बुध्दिमत्ता व अध्यापन शैली यात खालील गटात

लक्षणीय सहसंबंध नाही -
अ) शिक्षक आणि शिक्षिक ब)ग्रामीण शिक्षक आणि शहरी शिक्षक
क)अनुदानित आणि विनाअनुदानित शाळेतील शिक्षक ड) शैक्षणिक अनुभवानुसार
ई) एकूण शिक्षक

सारणी 3

माध्यमिक स्तरावरील शिक्षकांच्या भावनिक बुद्धिमत्ता व अध्यापन शैली यातील सहसंबंध गुणकाचे अर्थनिर्वचन

| भावनिक बुद्धिमत्ता आणि अध्यापन शैली | | शिक्षक | शिक्षिका | ग्रामीण शिक्षक | शहरी शिक्षक | अनुदानित शाळेतील शिक्षक | विनाअनुदानित शाळेतील शिक्षक | 0 ते 10 वर्ष शैक्षणिक अनुभव | 11 पेक्षा जास्त वर्ष शैक्षणिक अनुभव | एकूण शिक्षक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| णमुना | | 287 | 209 | 239 | 257 | 450 | 46 | 203 | 293 | 496 |
| स्वाधीनता मात्रा | | 285 | 207 | 237 | 255 | 448 | 44 | 201 | 291 | 494 |
| कोष्टकीय R | 0 . 05 | 0 . 113 | 0 . 139 | 0 . 139 | 0 . 113 | 0 . 098 | 0 . 312 | 0 . 139 | 0 . 113 | 0 . 088 |
| | 0 . 01 | 0 . 149 | 0 . 182 | 0 . 182 | 0 . 149 | 0 . 129 | 0 . 402 | 0 . 182 | 0 . 149 | 0 . 115 |
| सहसंबंध गुणक | | 0 . 1493 | 0 . 1667 | 0 . 3164 | 0 . 0101 | 0 . 1355 | 0 . 3187 | 0 . 2397 | 0 . 1103 | 0 . 1561 |
| सार्थकता स्तर | | 0 . 01 | 0 . 05 | 0 . 01 | लक्षणीय नाही | 0 . 01 | 0 . 05 | 0 . 01 | लक्षणीय नाही | 0 . 01 |

वरील सारणीवरून असे दिसून येते की, माध्यमिक स्तरावरील शिक्षिका, विनाअनुदानित शाळेतील शिक्षक यांच्या भावनिक बुद्धिमत्ता व अध्यापन शैली यांतील सहसंबंधात प्राप्त 'र' हा 0 . 05 स्तरावरील कोष्टकीय 'र' पेक्षा जास्त आहे . म्हणून ही परिकल्पना 0 . 05 स्तरावर त्याज्य ठरते . तसेच शिक्षक , ग्रामीण शिक्षक अनुदानित शाळेतील शिक्षक, 0 ते 10 वर्ष शैक्षणिक अनुभव असणारे शिक्षक आणि एकूण शिक्षक यांच्या भावनिक बुद्धिमत्ता व अध्यापन शैली यांतील सहसंबंधात प्राप्त 'र' हा 0 . 01 स्तरावरील कोष्टकीय 'र' पेक्षा जास्त आहे . म्हणून ही परिकल्पना 0 . 01 स्तारावर त्याज्य ठरते .

**निष्कर्ष**

माध्यमिक स्तरावरील शिक्षक, शिक्षिका, ग्रामीण शिक्षक, अनुदानित शाळेतील शिक्षक, विनाअनुदानित शाळेतील शिक्षक , 0 ते 10 वर्ष शैक्षणिक अनुभव असणारे शिक्षक आणि एकूण शिक्षक यांची भावनिक बुद्धिमत्ता व अध्यापन शैली यात लक्षणीय सहसंबंध आहे . हा सहसंबंध धन स्वरुपाचा आहे . माध्यमिक स्तरावरील शहरी शिक्षक आणि 11 पेक्षा जास्त वर्ष शैक्षणिक अनुभव असणारे शिक्षक यांच्या भावनिक बुद्धिमत्ता व अध्यापन शैलीत लक्षणीय सहसंबंध नाही .

**निष्कर्ष**

1)विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांची भावनिक बुद्धिमत्ता ही अनुदानित शाळेतील शिक्षकांच्या भावनिक बुद्धिमत्तेपेक्षा जास्त आहे .
2)विनाअनुदानित शाळेतील शिक्षकांची अध्यापन शैली ही अनुदानित शाळेतील शिक्षकांपेक्षा जास्त चांगली आहे 0 ते 10 वर्ष शैक्षणिक अनुभव असणाऱ्या शिक्षकांची अध्यापन शैली ही 10 पेक्षा जास्त वर्ष शैक्षणिक अनुभव असणाऱ्या शिक्षकांपेक्षा जास्त आहे .
3)माध्यमिक स्तरावरील शिक्षक, शिक्षिका, ग्रामीण शिक्षक, अनुदानित शाळेतील शिक्षक, विनाअनुदानित शाळेतील शिक्षक, 0 ते 10 वर्ष शैक्षणिक अनुभव असणारे शिक्षक आणि एकूण शिक्षक यांच्या भावनिक बुद्धिमत्ता व अध्यापन शैलीत लक्षणीय सहसंबंध आहे .

**शिफारशी**

**शिक्षक :**

1)अध्ययन व अध्यापन प्रक्रियेत आपल्या व विद्यार्थ्यांच्या भावना समजून भावनांची योग्य सांगड घालावी .
2)वर्गात असणाऱ्या विद्यार्थ्यांतील व्यक्तिभिन्नातेचा शोध घेऊन या सर्वांशी सुवर्णमध्य अध्यापन शैली निवडावी .
3)विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक समस्यांव्यतिरिक्त इतर काही वैयक्तिक समस्या ज्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडसर होऊ पाहतात, अशा समस्यांकडे लक्ष देऊन त्यातून विद्यार्थ्याला योग्य

शाळा :

1)शालेय व वैयक्तिक समस्यांवर चर्चासत्र आयोजित करावीत .
2)शाळेत भावभावना प्रकट करणारे प्रसंगचित्रे, बोधपर विधाने, व्यंगचित्रे, कात्रणे यांचे प्रदर्शन भरविणे .

संदर्भ ग्रंथ सूची

Best, J and K.J.(2003). Research in education(7th ed.),New Delhi.
Goleman Daniel (1996).'Emotional Intelligence' Buntum publisher.
Mishra R.C.(2007).Teaching Style,APH publishing corporation.
Kyriacou Chris.'Effective Teaching in School Theory'.
Buch M.B. (1983-84). Fourth survey of educational Research Vol I & II..
भिंताडे वि . रा . (2006) . 'शैक्षणिक संशोधन पध्दती', पुणे : नित्य नूतन प्रकाशन
गाजरे व चिटणीस (1998) . 'अध्ययन व अध्यापनाचे मानसशास्त्र आणि मानसशास्त्रीय प्रयोग'
डॉ . जगताप ह . ना . (2005) . 'प्रगत शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र' पुणे : नित्य नूतन
प्रकाशन . मुळे व उमाटे (1998) . 'शैक्षणिक संशोधनाची मुलतत्त्वे', औरंगाबाद विद्या बुक्स .
पाटील बा . भा . (1999) . 'संशोधन पध्दती', नागपूर : मंगेश प्रकाशन .
केळकर संदिप (2011) . भावनांचा रिमोट (प्रथमावृत्ती) व्यास क्रिएशन्स .
शिक्षण संक्रमण . वर्ष 37 वे अंक 8वा, ऑगस्ट 2003, ऑगस्ट 2004 .
शिक्षण समीक्षा . ऑगस्ट-सप्टेंबर 2004 .
Edusearch- Journal of educational research,Vol 1/ No 1/ April 2010
Horizon-The Journal of Education, Vol 1/ No 1 / Jan 2011

**d{]gmB©Q**

www.google.com
www.eric.com
www.teacherplanet.com.
www.wikpedia.org
www.academicjournals.org

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net